सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १७८ | शनिवार, दि. २१ मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





**श्री. शेखर आप्पा धनगर**
ग्रामसेवक



**प्रा. सौ. विद्या चौक**
अमळनेर/पुणे

## दिनविशेष
२१ मार्च

- शिवाजी महाराजांनी कुलाबा रायगड किल्ल्याची बांधणी सुरू केली.
- ब्रिटीश जनरल सर ह्यू रोज यांनी झाशीला वेढा घातला.
- जळगाव महानगरपालिकेची स्थापना.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेव्हा-तेव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

# सात हजार कोटींची कमाई करणारे महाराष्ट्रातले गाव!

## सर्वसामान्य माणसाचेही झाले शंभर रुपयांचे १० कोटी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील एका गावातील बहुतांश जण करोडपती आहेत असे तुम्हाला सांगितले तर तुमचा त्यावर विश्वास बसणार नाही. मात्र, येथे साधा वाटणारा माणूसही कोट्यवधी रुपयांचा मालक आहे. हे गाव कोणते आणि तिथल्या लोकांनी एवढा पैसा कसा कमवला याची रंजक गोष्ट वाचाच...



महाराष्ट्रातील एका छोट्याश्या गावामधील अनेक लोक केवळ शेअर मार्केटच्या जोरावर कोट्यधीश झाले आहेत. रस्त्यावरुन चालणारा अगदी साधासुधा दिसणारा माणूस सुद्धा पाच ते १० कोटींचा मालक आहे. शेअर बाजारामध्ये गुंतवणुकीच्या माध्यमातून तब्बल ७ हजार कोटी रुपये कमवले आहेत. हे गाव आहे कोणते आणि त्यांनी असं केलं काय ते पाहूयात. महाराष्ट्रात ज्या गावाने शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करुन ७ हजार कोटींपेक्षा अधिक पैसा कमावला आहे त्या गावामध्ये सध्याच्या घडीला भारतातील आघाडीच्या कंपनीची ३ टक्के मालकी आहे. ही मालकी त्यांना अशीच मिळालेली नाही. त्यांनी अगदी सुरुवातीपासून या कंपनीवर विश्वास ठेवला आणि आज त्या विश्वासाचे सोने झाले आहे. सुरुवातीपासून गुंतवणूक कशी फायद्याची ठरु शकते याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

### विप्रोत केली गुंतवणूक अन् पालटले नशीब

या गावातील गावकऱ्यांकडे विप्रो कंपनीतील ३ टक्के भागीदारी आहे. १९४५ मध्ये मोहम्मद हुसैन प्रेमजी यांनी विप्रो कंपनीची सुरुवात याच गावातून केली होती. सुरुवातीला ही कंपनी तूप, तेल, साबण यासारख्या वस्तूंची विक्री केली जायची. विप्रोचा आयपीओ बाजारात आणला १९६६ मध्ये अझीम प्रेमजी विप्रोचे अध्यक्ष झाले. कंपनीचा कारभार हाती आल्यानंतर अझीम प्रेमजींनी वेगाने कंपनीचा विस्तार सुरु केला. त्यांनी १९७० मध्ये विप्रोचा आयपीओ बाजारात आणला. हा आयपीओ बाजारात आणताना त्यांनी आपल्या अनेक कर्मचाऱ्यांना विप्रोचे शेअर्स भेट म्हणून दिले.

गावकऱ्यांनी विप्रोमध्ये गुंतवणूक करावी असे आवाहन अझीम प्रेमजींनी केली. त्यानुसार गावकऱ्यांनी आपआपल्या परीने कंपनीमध्ये गुंतवणूक केली. हीच छोटीशी गुंतवणूक आज कोट्यवधी रुपयांमध्ये परावर्तित झाली आहे. विप्रो कंपनीत सुरुवातीला केलेल्या १०० रुपयांच्या गुंतवणुकीची किंमत आज १० कोटी रुपयांपेक्षा अधिक असली तरी सात हजार कोटी कसे कमवले हा प्रश्न तुम्हाला पडू शकतो. तर इथे दिलेली किंमत ही केवळ शेअर्सची किंमत आहे. कंपनीची हिस्सेदारी, डिव्हिडंट आणि विप्रो कंपनीने या लोकांना वेळोवेळी अनेकदा डिव्हिडंट दिला आहे. या माध्यमातूनही लोकांनी कंपनीमधून कमाई केली आहे. त्यामुळेच या गावातील लोकांकडे असलेली कंपनीची हिस्सेदारी, डिव्हिडंट आणि एकत्रित मूल्य याचा हिशोब लावला तर एकूण रक्कम ७ हजार कोटींहून अधिक होते.

**हे गाव कोणते?**

महाराष्ट्रातील या गावाचे नाव आहे अमळनेर! त्यावेळी छोटसे गाव असणारे अमळनेर आज शहरामध्ये रुपांतरीत झाले आहे. याच अमळनेरमधील गावकऱ्यांनीच विप्रोमध्ये अगदी स्थापनेपासून गुंतवणूक करुन त्या माध्यमातून ७ हजार कोटींची संपत्ती जमवली आहे





*अमळनेर : वादळी वाऱ्याने जमिनदोस्त झालेला मका. दुसऱ्या छायाचित्रात तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांना निवेदन देताना काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भागवत सूर्यवंशी, शहराध्यक्ष गजेंद्र साळुंखे, संदीप घोरपडे, प्रा. श्याम पवार, मनोज पाटील, लोटन अण्णा चौधरी, भास्कर बोरसे, भगवान संदानशिव आदी.*

# वादळी वाऱ्याने पिके जमिनदोस्त

## तालुक्याची स्थिती, पंचनाम्यांची मागणी; काँग्रेसतर्फे तहसीलदारांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील बहुतांशी गावांमध्ये गुरुवार, दि. १९ मार्चला रात्री वादळी वाऱ्यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. हातातोंडाशी आलेला घास हिरावल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. काढणीवर असलेला मका, गहू, बाजरी, ज्वारी, हरभरा यांसह कांदा, टोमॅटो व आंबा पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. ठिकाणी पिके पूर्णतः आडवी झाली आहेत. पिकांचे त्वरीत पंचनामे करून नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. याबाबत काँग्रेसनेही तहसीलदारांना निवेदन दिले आहे.

तालुक्यातील पातोंडा, नांद्री, खवशी, पिंपळी, दहिवद, मठगव्हाण या पूर्वेकडील भागांमध्ये वादळी वाऱ्याचा सर्वाधिक फटका बसला आहे. मका, बाजरी, ज्वारी व दादर पिके जमिनीवर आडवी पडली आहेत. आता ती पुन्हा उभी राहण्याची शक्यता नसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. गहू कापणीच्या अवस्थेत असताना वादळ आल्याने पोटापाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. हरभऱ्याचे घाटे गळून पडले आहेत. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनाचे सुमारे ७५ टक्के नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकरी पूर्णपणे हवालदिल झाला आहे. शासनाने पंचनामे करून तातडीने मदत जाहीर करावी, अशी मागणी जोर धरत आहे. काँग्रेसने तहसीलदारांना निवेदन देऊन नुकसानग्रस्त पिकांचे त्वरित पंचनामे करण्याची मागणी केली आहे. शेतकऱ्यांना तातडीने अनुदान स्वरूपात आर्थिक मदत द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. याप्रसंगी तालुकाध्यक्ष भागवत सूर्यवंशी, शहराध्यक्ष गजेंद्र साळुंखे, संदीप घोरपडे, प्रा. श्याम पवार, मनोज पाटील, लोटन अण्णा चौधरी, भास्कर बोरसे, हरिप्रसाद कापडे, बन्सीलालजी भागवत, पी. वाय. पाटील, सईद तेली, राजू भाट, साबीरखा, फरीद खा आदी उपस्थित होते.

**शहापूर येथे मोठे नुकसान**

तालुक्यातील शहापूर परिसरात झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे मका पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. हातातील पीक अक्षरशः नष्ट झाले आहे. पावसामुळे काढणीस तयार मका ओला पडला. शेतात कापलेला मका भिजल्याने दाणे सडण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी वाऱ्यासह पाऊस झाल्याने पिके पूर्णतः आडवी पडली आहेत, अशी माहिती माजीसरपंच तथा विकास सोसायटीचे चेअरमन दिलीप श्रीराम पाटील यांनी दिली आहे.

## नृत्य नाटिका एवं संगीत रामायण

## मुंबई येथे २६ मार्चला शो

### अमळनेरकर महालेंची भव्य प्रस्तुती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




अमळनेर : महेक आणि मिहिर प्रस्तुत 'नृत्य नाटिका एवं संगीत रामायण'चा शो गुरुवार, दि. २६ मार्च रोजी सायंकाळी साडेसहा ते रात्री दहा या वेळात मुंबई येथील माटुंगा भागातील भव्य असलेल्या श्री षण्मुखानंद ऑडिटोरियम येथे होणार आहे.

संजय महाले यांनी या नृत्य नाटिकेचे लेखन व निर्देशन केले आहे. ते मुंबई महापालिकेचे निवृत्त उपायुक्त असून, मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांचे लहान बंधू आहेत. मिहिर महाले डिजिटल दिग्दर्शक आहेत. महेश मांजरेकर, पुनीत इस्सार, हिमांशू सोनी, केतर करंडे, कुणाल फडके, गौरी इंगवले, समीरा गुजर, निकिता बाणावलीकर, नेहा कामत या दिग्गज कलाकारांनी या नृत्य नाटिकेत भूमिका साकारल्या आहेत. स्वप्निल राजशेखर (ऋषी/सूत्रधार) यांनी यात प्रमुख भूमिका साकारली आहे. सावनी रवींद्र (राष्ट्रीय पुरस्कार विजेता) नचिकेत देसाई गायक आहेत. नितीन शंकर यांनी संगीत दिले आहे. 'बूक माय शो' या संकेतस्थळावर बुकींग सुरू आहे. अधिक माहितीसाठी (मो. ९३२११५४५२०) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन डिजिटल दिग्दर्शक मिहिर महाले यांनी केले आहे.

## वसुली कर्मचाऱ्यांना लवकरच मिळणार टॅब

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिकेच्या कर्मचाऱ्यांना वसुलीसाठी टॅब देण्यात यावा, अशी मागणी नगरसेविका सौ. कल्पना शर्मा यांनी बुधवार, दि. १८ मार्च रोजी केली होती. नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर व मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी यास मंजुरी दिली आहे. येत्या सर्वसाधारण सभेत याबाबत ठराव मांडण्यात येईल. त्यानंतर लवकरात लवकर कर्मचाऱ्यांना टॅब देण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले आहे. कर्मचाऱ्यांना टॅब दिल्यानंतर जास्तीत जास्त वसुली करावी. शंभर टक्के उद्दीष्ट पूर्ण करावे, असे आवाहन मुख्याधिकारी शिंदे यांनी केले आहे. वसुली कर्मचाऱ्यांना टॅब मिळाल्यानंतर वसुलीच्या कामात सुसुत्रता येणार आहे. तसेच जलदगतीने वसुली होऊन पालिकेचे उद्दीष्टपूर्तीसाठी याचा लाभ होणार आहे. या मंजुरीबद्दल नगरसेविका सौ. शर्मा व मुन्ना शर्मा यांनी नगराध्यक्ष डॉ. बाविस्कर व मुख्याधिकारी शिंदे यांचा ऋणनिर्देश केला आहे.

## 'प्रताप संवाद' पत्रिका

# ना. शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते प्रकाशन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळाच्या 'प्रताप संवाद' या शैक्षणिक मासिकाचे केंद्रीय कृषिमंत्री ना. शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते गुरुवार, दि. १९ मार्च रोजी प्रकाशन झाले. याप्रसंगी जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री ना. गिरीश महाजन, पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील, केंद्रीय राज्यमंत्री मंत्री रक्षाताई खडसे, खासदार स्मिताताई वाघ, आमदार अनिलदादा पाटील, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य व्यंकैया भागैय्याजी, अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे केंद्रीय क्षेत्रकार्यवाह बाळासाहेब चौधरी, अक्षय कृषी परिवाराचे मनोजभाई सोलंकी, खानदेश शिक्षण मंडळाचे अध्यक्ष विनोद अग्रवाल, कार्याध्यक्ष सीए नीरज अग्रवाल, ज्येष्ठ संचालक योगेश मुंदडे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

### 'प्रताप संवाद' पत्रिकेची वैशिष्ट्ये आणि उद्दिष्टे:

मुख्य उद्देश : विद्यार्थी, माजी विद्यार्थी, अध्यापक आणि संस्था यांच्यात प्रभावी सुसंवाद प्रस्थापित करणे हे या मासिकाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. ब्रीदवाक्य : "संकल्प एक, ध्येय अनेक, सुसंवादासाठीच हे लेख" या ब्रीदवाक्यावर ही पत्रिका आधारित आहे. माहितीचे माध्यम : संस्थेमध्ये सुरू असलेले विविध उपक्रम, विद्यार्थ्यांचे यश आणि शैक्षणिक घडामोडी प्रत्येक विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी, शिक्षक आणि सभासदांपर्यंत पोहोचवण्यासाठी हे ई-मासिक सुरू करण्यात आले आहे. डिजिटल स्वरूप : ही पत्रिका ऑनलाईन स्वरूपाची असून ती सोशल मीडियाच्या माध्यमातून सर्वांपर्यंत पोहोचवण्यात येईल.

अराजकीय धोरण : या शैक्षणिक मासिकात कोणत्याही प्रकारची राजकीय बातमी येणार नाही, याची विशेष दखल संस्थेकडून घेतली जाणार आहे. संस्थेचे कार्याध्यक्ष सीए नीरज अग्रवाल यांनी व्यक्त केलेल्या भावनांनुसार, या सुसंवादातून विद्यार्थ्यांच्या करिअर आणि आयुष्याला उत्तम दिशा प्राप्त व्हावी हा यामागील खरा हेतू आहे. थेट देशाच्या केंद्रीय कृषी मंत्र्यांच्या हस्ते व अनेक दिग्गज नेत्यांच्या उपस्थितीत या पत्रिकेचे प्रकाशन झाल्याने, खानदेश शिक्षण मंडळाच्या या नव्या उपक्रमाला मोठी ऊर्जा मिळाली आहे.




*अमळनेर : प्रताप संवाद शैक्षणिक मासिकाचे प्रकाशन करताना केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान. शेजारी मंत्री ना. गिरीश महाजन, ना. गुलाबराव पाटील, ना. रक्षाताई खडसे, खासदार स्मिताताई वाघ, व्यंकैय्या भागैय्याजी, मनोजभाई सोलंकी, बाळासाहेब चौधरी, सीए नीरज अग्रवाल, विनोद अग्रवाल आदी.*

## संपादकीय

# युद्धाच्या ज्वाळा जलसाठ्यांकडे...

अमेरिकन हल्ल्यात होर्मुझ सामुद्रधुनीजवळील केशम बेटावर असलेले खारे पाणी गोड करण्याचे मुख्य संयंत्र उद्ध्वस्त झाले. हे युद्ध नैसर्गिक साधनसंपत्तीच्या विनाशाचे निमित्त ठरत आहे. परिस्थिती लवकर आटोक्यात आली नाही, तर भविष्यात शस्त्रास्त्रांपेक्षा जास्त मृत्यू हे तहानेमुळे होतील, अशी चिन्हे दिसत आहेत. इराणच्या अण्वस्त्रांवरून सुरू झालेला हा संघर्ष आता केवळ सीमेवरील चकमकींपर्यंत मर्यादित न राहता मानवी अस्तित्वाचा पाया असलेल्या पाणीपुरवठा आणि त्याच्या सुरक्षा यंत्रणांच्या नाशापर्यंत पोहोचला आहे. इराणच्या परराष्ट्रमंत्र्यांनी नुकताच असा खळबळजनक आरोप केला, की अमेरिकन हल्ल्यात होर्मुझ सामुद्रधुनीजवळील 'केशम' बेटावर असलेले खारे पाणी गोड करण्याचे (डिसेलिनेशन) मुख्य संयंत्र पूर्णपणे उद्ध्वस्त झाले. यामुळे परिसरातील सुमारे ३० गावांचा पाणीपुरवठा पूर्णपणे खंडित झाला. याला प्रत्युत्तर म्हणून इराणने बहरीनमधील जल शुद्धीकरण प्रकल्पांना लक्ष्य केले. त्यामुळे आता हे युद्ध तेल आणि लष्करी तळांच्या पलीकडे जाऊन थेट पाण्यावर येऊन ठेपले आहे. खाडी देशांमधील मोठी लोकसंख्या ही नैसर्गिक पाण्याच्या स्रोतांच्या अभावामुळे याच कृत्रिम प्रकल्पांवर अवलंबून आहे. त्यामुळे या केंद्रांना लक्ष्य करणे म्हणजे संपूर्ण नागरी वस्तीला मृत्यूच्या खाईत ढकलण्यासारखे आहे. माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी म्हणाले होते, की पुढचे जागतिक युद्ध हे पाण्यासाठी होईल. सध्या मध्य आशियामध्ये सुरू असलेली परिस्थिती पाहता हे विधान आता प्रत्यक्षात उतरताना दिसत आहे. आखाती देशांनी आता आपल्या तेल विहिरींपेक्षा या जलसंयंत्रांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यास सुरुवात केली असून या केंद्रांभोवती आधुनिक क्षेपणास्त्रे आणि ड्रोन तैनात केले आहेत. या प्रकल्पांना होणारी थोडीशी इजादेखील संपूर्ण देशाचे जनजीवन विस्कळीत करण्यास पुरेशी आहे.

विशेषतः बहरीन, कतार आणि कुवेत यांसारख्या देशांकडे पाण्याचे पर्यायी स्रोत अत्यंत कमी असल्याने त्यांना या युद्धाचा सर्वाधिक फटका बसण्याची शक्यता आहे. इराणसाठी हे युद्ध केवळ लष्करी नसून ते अस्तित्वाचे युद्ध बनले आहे. कारण, त्यांच्या स्वतःच्या जल साठ्यांवरही मोठे संकट आहे. अमेरिकेने इराणची राजधानी तेहरानवर केलेल्या रासायनिक 'टॉक्सिक बॉम्ब'च्या हल्ल्यामुळे तेथील स्थिती अत्यंत भयावह झाली. या हल्ल्यात तेहरानमधील ३० मोठे जलसाठे निकामी झाले असून हवेत विषारी धूर पसरला. या प्रदूषणामुळे शहरात 'ॲसिड रेन'ची भीती निर्माण झाली. नैसर्गिक जलाशयांच्या पृष्ठभागावर तेलाचा आणि रसायनांचा जाड थर जमा झाल्यामुळे ते पाणी पिण्यायोग्य राहिले नाही. या संकटामुळे तेहरानमधील सुमारे ९० लाख नागरिक पिण्याच्या पाण्यासाठी व्याकुळ झाले असून शहरात अघोषित संचारबंदी लागू केली आहे. केवळ इराणच नाही, तर लेबनॉनमधील हिजबुल्लाच्या तळांवरदेखील असेच टॉक्सिक बॉम्ब टाकले जात आहेत, जे पिकांचा नाश करण्यासोबतच जमिनीखालील पाण्याचे साठे कायमचे दूषित करत आहेत. सौदी अरेबिया, कुवेत, ओमान आणि कतार यांसारख्या देशांच्या अर्थव्यवस्थेचा कणा तेल असले, तरी त्यांच्या अस्तित्वाचा आधार जल शुद्धीकरण संयंत्रे हाच आहे. या देशांतील ९० टक्के पिण्याचे पाणी समुद्राच्या खाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करून मिळवले जाते. एका जुन्या अमेरिकन राजनैतिक दस्तावेजात असा इशारा दिला होता की, सौदी अरेबियातील 'जुबेल' जल केंद्राला किंवा तिथल्या पाईपलाइनला हानी पोहोचली, तर राजधानी रियाधला अवघ्या सात दिवसांत रिकामे करावे लागेल. यावरून या देशांची पाण्याची गरज आणि त्यांची हतबलता लक्षात येते. खाडी देशांनी तलावांमध्ये आणि पाणीपुरवठा साखळीत मोठी गुंतवणूक केली असली, तरी युद्ध काळात हे सर्व साठे असुरक्षित ठरत आहेत. इस्त्रायलने मात्र जल व्यवस्थापनात स्वतःला जागतिक महाशक्ती म्हणून सिद्ध केले आहे. इस्त्रायलकडे समुद्राचे पाणी पिण्यायोग्य बनवण्याचे जगातील सर्वात प्रगत तंत्रज्ञान आहे. त्यांनी केवळ कायमस्वरूपी प्रकल्पांवर विसंबून न राहता 'गेलमॉबाईल वॉटर फिल्ट्रेशन प्लांट' विकसित केले. हे संयंत्र म्हणजे एका ट्रकमध्ये बसवलेले फिरते शुद्धीकरण केंद्र असून ते कोणत्याही नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीच्या काळात अत्यंत प्रभावी ठरते.

संकटमास्त भागात जेथे पाणी दूषित झाले आहे, तेथे हा ट्रक पोहोचून लोकांना तत्काळ शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देऊ शकतो. पृथ्वीच्या एकूण रचनेचा विचार केला, तर ७१ टक्के भाग पाण्याने व्यापलेला असला, तरी त्यातील ९७ टक्के पाणी महासागरांमध्ये असून ते मानवी वापरासाठी थेट योग्य नाही. उरलेल्या ३ टक्के गोड्या पाण्यापैकी २.४ टक्के पाणी उत्तर आणि दक्षिण ध्रुवांवर बर्फाच्या रूपात साठलेले आहे. मानवाकडे उपलब्ध असलेले भूजल आणि नद्यांमधील पाणी हे एकूण पाण्याच्या तुलनेत १ टक्क्यांपेक्षाही कमी आहे. भारतात विशेषतः मुंबई, चेन्नई, कोलकाता, गोवा, वापी, दमण, तिरुवनंतपुरम, पुरी आणि कोझिकोड यांसारख्या किनारपट्टीवरील शहरांमध्ये भूजल पातळी झपाट्याने खालावत आहे. मुंबईची स्थिती तर सर्वात चिंताजनक असून ज्या गतीने तेथील जलसाठा उपसला जात आहे, त्यावरून २०३० पर्यंत मुंबईत गोड्या पाण्याचे मोठे संकट निर्माण होऊ शकते. जमिनीची नैसर्गिक रचना अशी असते, की पावसाचे पाणी एका मर्यादपर्यंतच जमिनीत मुरते; मात्र अतिउपशामुळे जमिनीखाली पोकळी निर्माण होत असून तिथे समुद्राचे खारे पाणी शिरू लागले आहे. यामुळे जमिनीतील गोड्या पाण्याचे साठे खराब होत आहेत. जागतिक तापमानवाढीमुळे अंटार्क्टिकातील बर्फाचे थर वेगाने वितळत असून समुद्र पातळी वाढत आहे. याचा धोका मुंबईसारख्या महानगरांनाही आहे. वाढत्या समुद्र पातळीमुळे किनारपट्टीवरील निवासी भागांतील विहिरी आणि कूपनलिकांमध्ये समुद्राचे खारे पाणी मिसळत आहे. यामुळे भविष्यात या शहरांमध्ये पिण्याच्या पाण्याचा भीषण दुष्काळ पडू शकतो. इराण आणि अमेरिका संघर्षामुळे किनारपट्टीवरील आणि आखाती देशांतील पिण्याच्या पाण्याचे संकट आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चिले जात आहे. हे युद्ध केवळ दोन विचारसरणींमधील किंवा सत्ता संघर्षाचे राहिलेले नाही, तर ते नैसर्गिक साधनसंपत्तीच्या विनाशाचे निमित्त ठरत आहे. ही परिस्थिती लवकर आटोक्यात आली नाही, तर भविष्यात शस्त्रास्त्रांपेक्षा जास्त मृत्यू हे तहानेमुळे होतील. पाण्याचे हे राजकारण आणि त्यावरून होणारे हल्ले मानवी संस्कृतीसाठी घातक असून, जल साठ्यांचे रक्षण ही आता काळाची गरज बनली आहे. जगाला आता जल संवर्धनाचे आणि शुद्धीकरणाच्या नवनवीन तंत्रज्ञानाचे महत्त्व नव्याने समजून घेण्याची वेळ आली आहे.

## श्री स्वामी समर्थ महाराज प्रकटदिन

# श्री मंगळग्रह मंदिरात पाद्यपूजन, अभिषेक



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील श्री मंगळग्रह मंदिरात श्री स्वामी समर्थ प्रकटदिनानिमित्त शुक्रवार, दि. २० मार्च रोजी श्री स्वामींच्या पादुकांचा अभिषेक करून पूजन करण्यात आले. वाल्मिक पाटील व सौ. जागृती पाटील, संदीप मराठे व सौ. रेखा मराठे पुजेचे मानकरी होते.

मंत्रोच्चाराच्या जयघोषात विधिवत पाद्यपूजन, अभिषेक करण्यात आला. श्री स्वामी समर्थांचा जयघोष करण्यात आला. यावेळी भाविकांची मोठी उपस्थिती होती. शुभम वैष्णव, तुषार दीक्षित, प्रसाद भंडारी, जयेंद्र वैद्य, यश जोशी, परशुराम शर्मा, गणेश जोशी, वैभव लोकाक्षी, हेमंत गोसावी, अक्षय जोशी आदींनी पौरोहित्य केले. दरम्यान, श्री स्वामी समर्थांच्या पादुकांच्या दर्शनासाठी मंदिरात दिवसभर भाविकांची गर्दी होती. ▲

## कामगार– ठेकेदार वादावर पडदा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या घनकचरा व्यवस्थापन कामगार आणि ठेकेदार मधील वाद अखेर ताडजोडी अंतर्गत मिटला आहे. माजी आमदार शिरीष चौधरी यांनी मध्यस्थी केली. त्यांच्या उपस्थितीत शुक्रवार दि. २० मार्च रोजी बैठक झाली. या बैठकीत नगराध्यक्ष डॉ परीक्षित बाविस्कर, मुख्याधिकारी गणेश शिंदे, ठेकेदार व कामगार उपस्थित होते. 'पीएफ'च्या मोबदल्यात कामगारांच्या बँक खात्यात प्रत्येकी २५ हजार रुपये जमा करून यापुढे वेतन बँक खात्यात जमा करावे असे सर्वानुमते ठरले. ▲

# गलवाडे रस्त्यावर अपघातांच्या प्रमाणात वाढ

## गतिरोधकाची मागणी; संतप्त नागरिक आंदोलनाच्या पावित्र्यात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गलवाडे रस्त्यावरील दाजिबा नगरमधील श्रीमती शोभा जयवंतराव पाटील यांचा अज्ञात वाहनाच्या धडकेत जागीच मृत्यू झाला होता. ही घटना रविवार, दि. १५ मार्च रोजी घडली होती. या घटनेने संतप्त नागरिकांनी रास्तारोको आंदोलन केले होते. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन केले होते. गलवाडे रस्त्यावर अपघातांचे प्रमाण वाढले आहे. यासाठी गतिरोधक उभारण्यात यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. मंगळवार, दि. २४ मार्चपर्यंत गतिरोधक न बसविल्यास रस्ता खोदून आंदोलन करण्यात येईल, असा इशारा नागरिकांनी दिलाआहे.

गेले काही महिन्यांनापासून पाच जणांना अपघातामुळे जीव गमवावा लागला आहे. माजी नगरसेवकांच्या नेतृत्वात वारंवार निवेदने देऊनही सार्वजनिक बांधकाम विभागाने याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे दाजीबानगर व परिसरातील नाहिलांनी बुधवार, दि. १८ मार्च रोजी सार्वजनिक बांधकाम विभागात जाऊन ठिया आंदोलन केल या वेळी उपाभियंता पी. ए. पाटील यांनी संबंधीत कंत्राटदाराशी संपर्क साधुन मंगळवारपर्यंत गलवाडे रस्त्यावर गतिरोधक टाकण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले होते. संतप्त नागरिकांनी मंगळवारपर्यंत गतिरोधक न टाकल्यास रस्ता खोदून आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला आहे. यावेळी नेहा परदेशी, तृप्ती डाके, योजना पाटील, सरला पाटील, सुरेखा पाटील, संगीता सोनार, सुशीला पाटील, कविता पाटील, सरिता पाटील, निर्मलाबाई, मनीषा पाटील, संगीता कापडणे, सुमेरसिंग पाटील आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ▲

# मंजुळ आवाजाचा बुलबुल

**पक्ष्यांची ओळख**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



**नाव :** बुलबुल Nightingale
**रंग :** डोके काळे, पाठ तपकिरी, पोट पांढरे, शेपटी खाली लाल ठिपका.
**चोच :** लहान,बारीक काळ्या रंगाचे.
**डोळे :** काळ्या रंगाचे चमकदार, डोळ्यावर तुरा
**घरटे :** बुलबुल वाळलेले गवत व काड्यां पासून दहा फुटी झाडावर गोल खोलगट घरटे बनविते.
**अंडी :** मादी दोन किंवा तीन अंडी घालते. अंड्यांचा रंग पांढरा असून त्यावर निळे ठिपके असतात. नर व मादी अंडी उबविण्याचे काम करतात.
**भक्ष :** बुलबुल वड पिंपळाचे फळ, फुलांचा मकरंद खातो. त्याच प्रमाणे किटक, अळ्या व कोवळी पान खातो.
**आवाज :** बुलबुलचा आवाज मधूर आहे. हा पक्षी मंजूळ व गोड गाणी गातो.
**इतर वैशिष्टे :** बुलबुल नर व मादी आयुष्यभर जोडीने राहतात. त्यामुळे याला लालबुड्या म्हणतात. टिट टिट टिट करून

**संग्राहक : प्रा. प्रकाश धर्माधिकारीनिसर्ग मित्र मंडळ,अमळनेर**



*अमळनेर : पंचायत समिती समग्र शिक्षा अभियानांतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या फिजिओथेरपी शिबिराप्रसंगी उपस्थित गटविकास अधिकारी एन. आर. पाटील. शेजारी प्रमोद पाटील, डॉ. रितिक कोठारी आदी.*

# जागतिक चिमणी दिनानिमित्त डी. आर. कन्या शाळेत उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जागतिक चिमणी दिनानिमित्त श्रीमती डी. आर. कन्या शाळेत करुणा क्लबच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमांद्वारे विद्यार्थिनींनी निसर्ग व पक्ष्यांप्रती आपली जाणीव आणि संवेदनशीलता प्रभावीपणे व्यक्त केली. यावेळी चिमणी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थिनींनी आकर्षक व कल्पक चित्रांमधून चिमण्यांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच 'एक मूठ धान्य' या उपक्रमांतर्गत विद्यार्थिनींनी चिमण्यांसाठी धान्य गोळा केले. यासोबतच चिमण्यांसाठी परडे (घरटी) तयार करून पक्ष्यांच्या संवर्धनासाठी एक सकारात्मक संदेश दिला.

या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थिनींमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण होऊन निसर्गाशी जुळलेले नाते अधिक दृढ झाले. शाळेच्या करुणा क्लबचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.



*अमळनेर : जागतिक चिमणी दिनानिमित्त गुरुवारी करुणा क्लबतर्फे श्रीमती डी. आर. कन्या शाळेत आयोजित चिमणी चित्रकला स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थिनी.* ▲

# दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विशेष फिजिओथेरपी शिबिर उत्साहात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पंचायत समितीच्या समग्र शिक्षा अभियानांतर्गत तालुक्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी लोकमान्य विद्यालयात नुकतेच विशेष फिजिओथेरपी तपासणी शिबिर घेण्यात आले. गरजू दिव्यांग विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी यात सहभाग घेतला.

गटविकास अधिकारी एन. आर. पाटील यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. शिक्षण विस्तार अधिकारी प्रमोद पाटील व रावसाहेब पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. फिजिओथेरपिस्ट डॉ. रितिक कोठारी, चाहत कोठारी यांच्या वैद्यकीय पथकाने विद्यार्थ्यांची तपासणी केली. मेंदूचा पक्षघात व इतर शारीरिक समस्या असलेल्या मुलांना त्यांनी व्यायामाच्या विविध पद्धती सांगितल्य पालकांनी घरच्या घरी कशी काळजी घ्यावी, याविषयी मार्गदर्शन केले. लोकमान्य शाळेचे मुख्याध्यापक यांनी सहकार्य केले. तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुखांनी आपापल्या केंद्रातील दिव्यांग विद्यार्थ्यांना या शिबिराचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले. विद्यार्थ्यांची नोंदणी करणे, त्यांना उपचारासाठी मदत करणे आणि पालकांच्या शंकांचे निरसन करणे यामध्ये केंद्रस्तरीय विशेष शिक्षकांचा मोठा सहभाग होता. सर्व केंद्रस्तरीय विशेष शिक्षकांनी परिश्रम घेतले. ▲

# काव्या मारनने लिलावात खरेदी केले, भारतात संताप...!

## आता पाकिस्तानच्या अबरार अहमदची पहिली प्रतिक्रिया, काय म्हणाला?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

काव्या मारन यांच्या मालकीच्या सनरायजर्स लीड्स या टीमने द हंड्रेड २०२६ च्या ऑक्शनमध्ये पाकिस्तान क्रिकेट संघाचा फिरकीपटू अबरार अहमद याला संघात घेतल्याने एकच खळबळ उडाली आहे. काव्या मारनने अबरार अहमदला संघात घेतल्यानंतर भारतातून संताप व्यक्त करण्यात आला. याचदरम्यान, आता अबरार अहमदची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डातील अंतर्गत सूत्रांनी सांगितले, की अबरार अहमद या वादामुळे ना अस्वस्थ आहे, ना तो त्याबद्दल चिंतीत आहे. सनरायझर्सने अबरार अहमदला संघात घेतल्यावर उमटलेल्या प्रतिक्रियांबाबत अबरार अहमदला काहीच आश्चर्य वाटले नाही. कारण अशा प्रकारचा प्रतिसाद मिळणार याची अबरार अहमदला आधीच कल्पना होती. त्यामुळे या वादाबाबत मला अजिबात चिंता नसल्याची प्रतिक्रिया अबरार अहमदने दिली आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने देखील सदर विषय केवळ इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्ड आणि संबंधित फ्रँचायझी यांच्यापुरताच मर्यादित आहे.



### सुनील गावसकरांनी देखील काव्या मारनला सुनावले

भारतीय क्रिकेट संघाचे माजी दिग्गज खेळाडू सुनील गावसकरांनी देखील काव्या मारनला सुनावले आहे. भारतीय मालकीची संस्था किंवा तिची परदेशातील शाखा जर अशा प्रकार पाकिस्तानी खेळाडूला पैसा देत असेल तर ती अप्रत्यक्षपणे भारतीयांच्या जीवितहानीत योगदान देत आहे. संघाचे प्रशिक्षक डॅनियल व्हिटोरी न्यूझीलंडचे असल्याने त्यांना या संवेदनशील बाबींची जाणीव नसावी. मात्र, मालकांनी परिस्थिती बघून निर्णय घ्यायला हवा होता, असे सुनील गावसकर म्हणाले.

### सनरायझर्स लीड्सकडून स्पष्टीकरण

अबरार अहमदला संघात घेण्याच्या आपल्या निर्णयाबाबत सनरायझर्स लीड्सने एक निवेदनही जारी केले. सनरायझर्स लीड्स संघाचे मुख्य प्रशिक्षक डॅनियल व्हेटोरीने म्हटले आहे, की अबरार अहमदच्या गोलंदाजीत प्रचंड विविधता आहे. तसेच इंग्लंडमधील स्थानिक खेळाडूंनी यापूर्वी कधीही त्याचा सामना केलेला नाही. लिलावात उपलब्ध असलेल्या प्रत्येक खेळाडूसाठी बोली लावण्यासाठी आम्ही पूर्ण तयारीने उतरलो होतो. जेव्हा हा पर्याय आमच्यासाठी उपलब्ध झाला, त्यावेळी अनेक उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय फिरकी गोलंदाज संभाव्य निवडीसाठी उपलब्ध होते. मात्र, आमची प्राथमिकता अबरार अहमदला आमच्या संघात घेणे हीच होती, असे डॅनियल व्हेटोरीने स्पष्ट केले.

### अबरार अहमदची कारकीर्द

२७ वर्षीय अब्रार अहमदने पाकिस्तानसाठी ३८ टी-20 आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. त्याच्या नावावर ५२ विकेट्स आहेत. आपल्या संपूर्ण कारकिर्दीत, त्याने ६. ६७ च्या इकॉनॉमी रेटने गोलंदाजी केली आहे. त्याच्या एकूण टी-२० क्रिकेट कारकिर्दीचा विचार करता, त्याने ८४ सामन्यांमध्ये १०९ विकेट्स पटकावल्या आहेत. ▲

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# खोट्या गुन्ह्यांच्या बेड्या तोडून तो झाला 'डीएसपी'

## आईच्या हातावरील 'ती' शपथ आणि बदलले आयुष्य

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एखाद्या तरुणाला उद्ध्वस्त करण्यासाठी जेव्हा संपूर्ण जग एकत्र येते तेव्हा त्याच्याकडे दोनच पर्याय उरतात; एक तर गुडघे टेकणे किंवा परिस्थितीचे दात घशात घालून नवी ओळख निर्माण करणे. या जिद्दी तरुणाने दुसरा पर्याय निवडला. ज्या हातांना एकेकाळी खोट्या गुन्ह्यांच्या बेड्या ठोकल्या गेल्या, आज त्याच हातांमध्ये पोलीस उपअधीक्षक (डीएसपी) पदाची जबाबदारी आली आहे.हातामध्ये बेड्या पडल्या असतानाही ज्याने डोळ्यातील स्वप्न मरू दिले नाही, असा हा जिद्दी तरुण म्हणजेच मध्य प्रदेशातील भिंड जिल्ह्यातील डोंगरपुरा गावातील जैनेंद्र कुमार निगम.

### निकाल लागला आणि डोळे पाणावले

अखेर त्याच्या कष्टाला फळ मिळाले. एमपीपीएससी २०२३ चा निकाल जाहीर झाला आणि जैनेंद्र कुमार निगम यांची निवड थेट डीएसपी पदावर झाली. ज्या हातांना बेड्या ठोकून गुन्हेगार ठरवण्याचा प्रयत्न झाला, आज त्याच हातांना सलामी देण्याची वेळ आली आहे. ज्या वडिलांचे स्वप्न अपुरे राहिले होते, त्यांचा मुलगा आता राज्याचा पोलीस उपअधीक्षक झाला आहे. ही बातमी जेव्हा जैनेंद्रने वडिलांना सांगितली, तेव्हा त्यांच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू हे केवळ आनंदाचे नव्हते, तर अनेक वर्षांच्या अन्यायावर मिळालेल्या विजयाचे होते.

**आयुष्याचा झाला होता थरारपट**

या तरुणाची ही कहाणी एखाद्या मोठ्या बॉलिवूड चित्रपटाच्या कथेपेक्षा कमी नाही. गरिबी, कुटुंबावर झालेला बहिष्कार, हक्काच्या जमिनीवर झालेला कब्जा आणि वारंवार होणारे जीवघेणे हल्ले अशा अनेक संकटांनी त्याला घेरले होते. इतकेच नव्हे, तर राजकारण आणि कोर्टाच्या फेऱ्यांमुळे संपूर्ण कुटुंब विखुरले गेले होते. आई-वडील हॉस्पिटलमध्ये मृत्यूशी झुंज देत होते आणि घर जळून खाक झाले होते. अशा परिस्थितीत या तरुणाने हार मानण्याऐवजी लढण्याचा निर्णय घेतला.

**आईच्या हातावरील 'ती' शपथ**

आयुष्यात अनेक वेळा संधी चालून आली होती. २०१५ मध्ये पोलीस कॉन्स्टेबल भरती आणि २०१७ मध्ये सबइन्स्पेक्टर परीक्षेत यश मिळवूनही केवळ नशिबाने आणि षडयंत्राने संधी हुकली. फिजिकल परीक्षेच्या दोन दिवस आधीच मुद्दामहून वाद घालून त्याला अडवण्यात आले. २०१९ मध्ये शिक्षक म्हणून निवड झाली, पण त्याने जॉईन केले नाही. खऱ्या संघर्षाला एप्रिल २०२० मध्ये सुरूवात झाली. त्याच्या आई-वडिलांवर जीवघेणा हल्ला झाला, घर जाळण्यात आले आणि त्यांच्यावरच खोटे गुन्हे दाखल करून तुरुंगात पाठवण्यात आले. ८ जानेवारी २०२१ रोजी हा तरुण जेव्हा तुरुंगातून बाहेर आला, तेव्हा त्याचे सर्व कुटुंब आतच होते. जून २०२१ मध्ये तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाचा अपघात घडवून आणण्यात आला. रुग्णालयात रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या आईची अवस्था पाहून तो पूर्णपणे तुटला होता. पण त्याच वेळी त्याने आईची हात हातात घेतली आणि त्यावर एक शपथ लिहिली. त्याने वचन दिले, की 'मी पूर्ण मेहनत करेन आणि आता थेट अधिकारी बनूनच परत येईन.'

**भिंडचा वाघ आणि स्वप्नांची भरारी**

मध्य प्रदेशातील या जैनेंद्रचे वडील स्वतः एमपीपीएससी परीक्षेच्या मुख्य फेरीपर्यंत पाच वेळा पोहोचले होते. पण खोट्या गुन्ह्यांमुळे त्यांचे स्वप्न अपूर्ण राहिले. वडिलांचे तेच स्वप्न उराशी बाळगून जैनेंद्रने अभ्यास सुरू ठेवला. जैनेंद्र जेव्हा इंदूरमध्ये अभ्यास करत होता, तेव्हा त्याच्यावर पुन्हा एकदा हत्येच्या प्रयत्नाचा (कलम ३०७) खोटा गुन्हा दाखल झाला. मात्र, तो त्यावेळी होस्टेलमध्ये असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमुळे सिद्ध झाले. एमपीपीएससी २०२३ च्या मुख्य परीक्षेवेळी त्याला मलेरिया आणि टायफॉइड झाला होता, तरीही अंगात ड्रिप लावून तो पेपर लिहायला बसला.



# सनईच्या सुरांनी जग जिंकणारे : भारतरत्न उस्ताद बिस्मिल्ला खान

जन्मदिन विशेष



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय शास्त्रीय संगीताच्या विश्वात सनईला अभिजात स्थान मिळवून देणारे महान कलाकार म्हणजे उस्ताद बिस्मिल्ला खान. त्यांचा २१ मार्च रोजी जन्मदिन. यानिमित्त त्यांच्या अद्वितीय कार्याचे आणि संगीत वारशाचे सर्वत्र गौरवपूर्वक स्मरण केले जाते. सनईसारख्या पारंपरिक वाद्याला जागतिक स्तरावर प्रतिष्ठा मिळवून देण्याचे श्रेय मोठ्या प्रमाणात उस्ताद बिस्मिल्ला खान यांना जाते.

उस्ताद बिस्मिल्ला खान यांचा जन्म २१ मार्च १९१६ रोजी बिहारमधील डुमराव येथे झाला. त्यांचे कुटुंब संगीत परंपरेशी जोडलेले होते. त्यांच्या वडिलांपासून आणि गुरूंकडून त्यांनी सनई वादनाचे धडे घेतले. वाराणसीतील घाट आणि मंदिरांच्या वातावरणात त्यांनी आपल्या कलेला आकार दिला. गंगा नदीच्या किनाऱ्यावर साधना करताना त्यांच्या सनईचे सूर अधिकाधिक परिपक्व होत गेले.

सनई हे वाद्य पूर्वी प्रामुख्याने लग्नसमारंभ किंवा धार्मिक कार्यक्रमांपुरते मर्यादित होते. परंतु उस्ताद बिस्मिल्ला खान यांनी आपल्या अथक परिश्रम आणि प्रतिभेच्या जोरावर सनईला भारतीय शास्त्रीय संगीतात मानाचे स्थान मिळवून दिले. त्यांनी सनईच्या सुरांमध्ये इतकी गोडी आणि भावपूर्णता आणली की ते वाद्य श्रोत्यांच्या हृदयात घर करून गेले.

१९४७ मध्ये भारताच्या स्वातंत्र्याच्या ऐतिहासिक क्षणी लाल किल्ल्यावरून सनई वादन करण्याचा मान उस्ताद बिस्मिल्ला खान यांना मिळाला. त्यांच्या सनईच्या सुरांनी त्या ऐतिहासिक क्षणाला अधिकच अविस्मरणीय बनवले. देश-विदेशातील अनेक संगीत कार्यक्रमांमध्ये त्यांनी सनई वादन करून भारतीय संस्कृतीचा गौरव वाढवला. त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत त्यांना अनेक सन्मानांनी गौरविण्यात आले. भारत सरकारने त्यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान केला. याशिवाय पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण असे अनेक पुरस्कारही त्यांना मिळाले. मात्र इतक्या मोठ्या कीर्ती असूनही ते अत्यंत साधे आणि विनम्र व्यक्तिमत्त्व होते.

उस्ताद बिस्मिल्ला खान यांचे जीवन आपल्याला साधेपणा, समर्पण आणि कलेप्रती निष्ठा यांचे मौल्यवान धडे देते. त्यांनी कधीही आपल्या मुळांपासून दूर जाण्याचा प्रयत्न केला नाही. वाराणसी आणि गंगा नदी यांच्याशी त्यांचे अतूट नाते होते.

आज त्यांच्या जन्मदिनानिमित्त आपण त्यांच्या संगीत वारशाचा सन्मान करताना भारतीय शास्त्रीय संगीताची समृद्ध परंपरा जपण्याचा संकल्प करूया. उस्ताद बिस्मिल्ला खान यांचे सनईचे सूर आजही रसिकांच्या मनात घुमत आहेत आणि पुढील पिढ्यांना प्रेरणा देत राहतील.

# निसर्ग संवर्धनाची अत्यावश्यक हाक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दरवर्षी २१ मार्च रोजी 'आंतरराष्ट्रीय वन दिन' साजरा केला जातो. वनांचे महत्त्व, त्यांचे संवर्धन आणि पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा दिवस पाळला जातो. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि मानवी हस्तक्षेप यामुळे वनसंपत्तीचा ऱ्हास झपाट्याने होत आहे. त्यामुळे आजच्या काळात वनसंवर्धन ही केवळ पर्यावरणीय गरज नसून मानवजातीच्या अस्तित्वासाठी अत्यावश्यक बाब बनली आहे.

वन हे पृथ्वीचे 'हिरवे फुफ्फुसे' मानले जातात. ते कार्बन डायऑक्साइड शोषून ऑक्सिजन निर्माण करतात. ज्यामुळे हवामान संतुलित राहते. हवामान बदलाच्या समस्येला रोखण्यासाठी वनांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. तसेच वन जैवविविधतेचे प्रमुख केंद्र आहेत. विविध प्रकारचे वनस्पती, प्राणी, पक्षी आणि सूक्ष्मजीव यांचे अस्तित्व वनांवर अवलंबून असते. या जैवविविधतेमुळे पर्यावरणीय साखळी टिकून राहते.

भारतासारख्या देशात वनसंपत्तीला सांस्कृतिक आणि आर्थिक महत्त्वही आहे. अनेक आदिवासी समुदायांचे जीवन वनांवर आधारित आहे. औषधी वनस्पती, लाकूड, इंधन आणि इतर नैसर्गिक साधनसंपत्ती यांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळते. परंतु अनियंत्रित वृक्षतोड, जंगलातील आगी, खाणकाम

## आंतरराष्ट्रीय वन दिन विशेष



आणि अतिक्रमण यामुळे वनक्षेत्र झपाट्याने कमी होत आहे.

वनसंवर्धनासाठी शासन आणि समाज या दोघांचीही जबाबदारी महत्त्वाची आहे. वृक्षारोपण मोहिमा, वनसंरक्षण कायदे, आणि शाश्वत विकासाच्या धोरणांची अंमलबजावणी यावर भर देणे गरजेचे आहे. तसेच प्रत्येक नागरिकानेही आपल्या स्तरावर वृक्षारोपण करणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे आवश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय वन दिन हा केवळ एक औपचारिक दिवस नसून, तो निसर्गाशी असलेल्या आपल्या नात्याची जाणीव करून देणारा दिवस आहे. भविष्यातील पिढ्यांसाठी समृद्ध आणि संतुलित पर्यावरण निर्माण करण्यासाठी वनांचे जतन करणे ही काळाची गरज आहे. चला, या दिवशी आपण सर्वजण वनसंवर्धनाचा संकल्प करूया आणि 'हिरवी पृथ्वी, सुरक्षित भविष्य' घडविण्यासाठी हातभार लावूया.




## तयार केला रॉकेट स्टोव्ह, गॅस शिवाय २ मिनिटांत बनते जेवण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सध्या देशभरात एलपीजी गॅसचा तुटवडा जाणवतोय. पण यावर समस्या म्हणून एका व्यक्तीने रॉकेट स्टोव्ह तयार केला आहे. जो कमी लाकडांमध्ये जास्त उष्णता देतो. चला पाहूया हा व्हायरल व्हिडिओ.

इस्राईल आणि इराणमध्ये सध्या युद्ध सुरू आहे. या युद्धामुळे मध्यपूर्व आशियात गोंधळ निर्माण झाला आहे. परिणामी भारतामध्ये सध्या एलपीजी गॅसचा तुटवडा जाणवत आहे. अनेक ठिकाणी गॅस सिलिंडर १५-२० दिवस उशिरा मिळत आहेत. काही ठिकाणी तर जास्त किंमत आकारून सिलिंडर विकले जात आहेत. पण या समस्येवर तोडगा काढण्यासाठी आता आणखी एक जुगाड समोर आला आहे. एका व्यक्तीने अनोखी चूल तयार केली आहे. हे गावातील मातीच्या चुलीचे अपग्रेड व्हर्जन आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

हा व्हिडिओ @HasnaZaruriHai या एक्स अकाउंटवरून शेअर करण्यात आला आहे. या चुलीचे वैशिष्ट्य म्हणजे ती दोन भागांमध्ये विभागलेली आहे. एक भाग जेथून जळण्यासाठी लाकूड टाकले जाते आणि दुसरा भाग जेथून हवा खेळती राहते. ज्यामुळे निखाऱ्यावर फुंकर मारण्याची गरज लागत नाही. ही चूल एल शेपमध्ये आहे आणि उभी असल्यामुळे किचनमध्ये कमी जागा घेते. तसेच ही चूल लोखंडाची असल्यामुळे भांड्याला जास्त उष्णता मिळते. परिणामी लाकूड कमी खर्च होते.

हा व्हिडिओ एक लाख ४७ हजारांहून अधिक वेळा पाहिला गेला आहे. शिवाय अनेकांनी यावर विविध प्रतिक्रिया दिल्या आहेत. काहींचे म्हणणे आहे, की भारताला कोणी हरवू शकत नाही. कारण आपण जुगाडात आघाडीवर आहोत. तर काही जण विचारत आहेत की ही चूल विकत मिळते का?

(महत्वाची टीप : या बातमीमध्ये नमूद करण्यात आलेली माहिती ही पूर्णपणे सोशल मीडियावरील पोस्टवर आधारित आहे. त्यामध्ये करण्यात आलेल्या दाव्यांची सत्यता दै. ग्लोबल महातेज'ने स्वतंत्रपणे पडताळून पाहिलेली नाही.)

# वीर रानी अब्बक्का उत्सव

क्या आप जानते है साल १५५५ में जब पुर्तगाली सेना कालीकट, बीजापुर, दमन, मुंबई जीतते हुए गोवा को अपना हेडक्वार्टर बना चुकी थी । टक्कर में कोई ना पाकर उन्होंने पुराने कपिलेश्वर मंदिर को ध्वस्त कर उस पर चर्च स्थापित कर डाली। मंगलौर का व्यवसायिक बंदरगाह अब उनका अगला निशाना था। उनकी बदकिस्मती थी कि वहाँ से सिर्फ १४ किलोमीटर पर 'उल्लाल' राज्य था जहां की शासक थी ३० साल की रानी 'अबक्का चौटा'। पुर्तगालियों ने रानी को हल्के में लेते हुए केवल कुछ सैनिक उसे पकडने भेजा। लेकिन उनमेंसे कोई वापस नहीं लौटा। क्रोधित पुर्तगालियों ने अब एडमिरल 'डॉम अल्वेरो ड-सिलवीरा' के नेतृत्व में एक बड़ी सेना भेजी। शीघ्र ही



जख्मी एडमिरल खाली हाथ वापस आ गया। इसके बाद पुर्तगालियों की तीसरी कोशिश भी बेकार साबित हुई। चौथी बार में पुर्तगाल सेना ने मंगलौर बंदरगाह जीत लिया। सोच थी कि यहाँ से रानी का किला जीतना आसान होगा, और फिर उन्होंने यही किया। जनरल 'जाओ पिक्सीटो' बड़ी सेना के साथ उल्लाल जीतकर रानी को पकड़ने निकला। लेकिन यह क्या? किला खाली था और रानी का कहीं अता-पता भी ना था। पुर्तगाली सेना हर्षोल्लास से बिना लड़े किला फतह समझ बैठी। वे जश्न में डूबे थे कि रानी अबक्का अपने चुनिंदा २०० जवान के साथ उनपर भूखे शेरो की भांति टूट पड़ी। बिना लड़े जनरल व अधिकतर पुर्तगाली मारे गए। बाकी ने आत्मसमर्पण कर दिया। उसी रात रानी अबक्का ने मंगलौर पोर्ट पर हमला कर दिया जिसमें उसने पुर्तगाली चीफ को मारकर पोर्ट को मुक्त करा लिया। कालीकट के राजा के जनरल ने रानी अब्बक्का की ओर से लड़ाई लड़ी और मैंगलुरु में पुर्तगालियों का किला तबाह कर दिया। लेकिन वहाँ से लौटते वक्त जनरल पुर्तगालियों के हाथों मारे गए।

### अब आप अन्त जानने में उत्सुक होंगे?

रानी अबक्का के देशद्रोही पति लक्षमप्पा ने पुर्तगालियों से धन लेकर उसे पकड़वा दिया और जेल में रानी विद्रोह के दौरान मारी गई। क्या आपने इस वीर रानी अबक्का चौटा के बारे में पहले कभी सुना या पढ़ा है? इस रानी के बारे में जो चार दशकों तक विदेशी आततायियों से वीरता के साथ लड़ती रही, हमारी पाठ्यपुस्तकें चुप हैं। अगर यही रानी अबक्का योरोप या अमेरिका में पैदा हुई होती तो उस पर पूरी की पूरी किताबें लिखी गई होती। है। आज भी रानी अब्बक्का चौटा की याद में उनके नगर उल्लाल में उत्सव मनाया जाता है और इस 'वीर रानी अब्बक्का उत्सव' में प्रतिष्ठित महिलाओं को 'वीर रानी अब्बक्का प्रशस्ति' पुरस्कार से नवाज़ा जाता है। इस कहानी से दो बातें साफ हैं । हमें हमारे गौरवपूर्ण इतिहास से जानबूझ कर वन्चित रखा गया है। "रानी अबक्का चौटा" के बारे में "कुछ लोग" तो शायद पहली बार ही ये सुन रहे होंगे, ये हमारी १००० साल की दासता अपने ही देशवासियों (भितरघातियों) के विश्वासघात का नतीजा है। दुर्भाग्य से यह आज भी यथावत है।

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# पूजा करताना मोहरीच्या तेलाचा दिवा का लावावा?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अनेकदा लोक शनिवारी शनी देवांना प्रसन्न करण्यासाठी मोहरीच्या तेलाचा दिवा लावतात. पण जर तुम्ही त्या दिव्यात एक लवंग ठेवला तर तुमचे नशीब बदलू शकते, असे ज्योतिषशास्त्रात म्हटले आहे. होय, जर तुम्ही या दिव्यात एक लवंग ठेवला तर पैसा तुमच्याकडे आकर्षित होऊ लागेल. यासोबतच व्यक्तीची आर्थिक स्थितीही मजबूत होते. असे मानले जाते, की जर तुम्ही हे सतत केले तर तुम्हाला पैशाची कमतरता भासणार नाही. दुसरीकडे शनिवारी सायंकाळी नियमितपणे मोहरीच्या तेलात दिवा लावल्याने भगवान शनी देव प्रसन्न होतात.

**शनिवारी दिव्यात लवंग ठेवण्याचे फायदे**

शनी देवांना लवंग अर्पण केल्याने त्यांचे आशीर्वाद मिळतात. शनीच्या साडेसाती आणि ढैय्याचे अशुभ परिणाम कमी होऊ शकतात. लवंगामध्ये नकारात्मक ऊर्जा दूर करण्याचे गुणधर्म असल्याने दिव्यात लवंग लावल्याने घरात सकारात्मक ऊर्जा येते. लवंग जाळल्याने मानसिक ताण आणि नकारात्मक विचार कमी होतात. ज्यामुळे मानसिक शांती मिळते. काही मान्यतेनुसार लवंग जाळल्याने संपत्ती आणि समृद्धी वाढते. लवंगामध्ये अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात, जे आरोग्यासाठी देखील फायदेशीर असतात. शनिवारी हे ५ मंत्र जपा, शनीची कृपादृष्टी मिळवा.

**शनिवारी दिव्यात लवंग ठेवण्याची पद्धत**

- स्वच्छ दिवा घ्या, ज्यामध्ये मोहरीचे तेल किंवा तूप घाला.
- दिव्यात २-३ लवंग ठेवा.
- दिवा लावताना तुमच्या मनात सकारात्मक विचार ठेवा आणि तुमच्या इच्छा प्रकट करा.
- दिवा लावल्यानंतर दिव्याने आरती करा आणि शनी देवाचा आशीर्वाद घ्या.

**शनिवारी मारुती स्तोत्र कधी आणि किती वेळा पठण करावे?**

शनिवारी हनुमानजींसमोर लवंग जाळणे देखील शुभ मानले जाते. काही लोक कापूर घालून लवंग जाळतात. काही लोक दिव्यात ७-८ लवंग टाकतात आणि सलग ७ शनिवारी जाळतात.

**शनी स्तोत्र किंवा दशरथकृत शनी स्तोत्र वाचण्याचे फायदे**

- शनीची साडेसाती, अडीच वर्षांची ढैय्या, शनीची महादशा यातून त्वरित मुक्ती मिळते.
- कर्जातून मुक्ती मिळते.
- आजारपण, मानसिक त्रास, कौटुंबिक क्लेश कमी होतात.
- नोकरी-व्यवसायातील अडथळे दूर होतात.
- हा उपाय एकदाच केला तरी शनीचा त्रास होत नाही, असा अनुभव आहे.



## सूर्यपुत्र शनिदेव

सुर्यपुत्र शनिदेवा, हे यमाग्रजा
हाती घेऊनी सत्य आणि न्यायाची ध्वजा
हे छाया मार्तंड सुता, कृपा करा
मी शरण तुम्हा शनैश्चरा ||१||
मंद मंद तुझा देवा फेरा दृष्टीचा तव चमत्कार न्यारा
नको नको तो जन्ममृत्यूचा फेरा
मी शरण तुम्हा शनैश्चरा ||२||
शककर्ता विक्रम राजा उज्जनीचा
गर्वाने त्याची बोलली ती वाचा
त्यास दाविला तुम्ही साडेसातीचा खेळ न्यारा
मी शरण तुम्हा शनैश्चरा ||३||
प्रत्यक्ष गुरूनाथासी ना सोडले
नेऊनी शुळापाशी परत आणिले
तव लीलेच्या न जाणे कोणी अंतपारा
मी शरण तुम्हा शनैश्चरा ||४||
तुझ्या ठायी न कोणी मोठा न सान
येता फेरा तुझा दाविसी तू निशाण
परी आळविता तुज, होई कृपावर्षाव सारा
मी शरण तुम्हा शनैश्चरा ||५||
येता तव फेरा रघुत्तमासी
धाडीसी वर्षे चौदा वनवासासी
ग्रह सीतेस येता,आला दशाननाचा फेरा
मी शरण तुम्हा शनैश्चरा ||६||
वैकुंठेश्वरासी त्वा ना सोडिले
स्यमंतकाचे त्यास डाग लागले
हरिश्चंद्राचा गेला राजपाट सारा
मी शरण तुम्हा शनैश्चरा ||७||
किती आळवू तुज हे न्यायप्रिया
सांभाळी मज, दे आश्रय सत्यप्रिया
मी किंकर तव चरणांचा, हे ग्रहेश्वरा
दास प्रमोद, तुम्हा शरण शनैश्चरा||८||

# मारुती स्तोत्राचे पठण कधी कराल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हनुमानजींच्या पूजेसाठी शनिवार आणि मंगळवार हा विशेष मानला जातो. कारण हनुमानजी शनी देवांच्या प्रभावाला नियंत्रित करतात, अशी श्रद्धा आहे. सकाळी लवकर (ब्रह्ममुहूर्त, ४:०० ते ६:००) किंवा सायंकाळी सूर्यास्ताच्या वेळी पठण करणे शुभ मानले जाते. विशेषतः शनिवारी किंवा मंगळवारी सायंकाळी हनुमान मंदिरात किंवा घरातील पूजास्थानावर पठण करावे. तसेच श्रीराम नवमी, हनुमान जयंती किंवा शनैश्चरी अमावास्येला पठण केल्यास अधिक फलदायी ठरते.

**किती वेळा पठण करावे?**

मारुती स्तोत्राचे १, ३, ५, ११ किंवा २१ वेळा पठण करावे. यामुळे मन एकाग्र होते. तसेच एखाद्या संकटातून मुक्ती हवी असेल किंवा विशेष मनोकामना असेल, तर ४० दिवस सलग ११ वेळा पठण करण्याचा संकल्प घ्यावा. मारुती स्तोत्रासोबत हनुमान चालिसा आणि बजरंग बाण यांचेही पठण केल्यास अधिक प्रभावी ठरते.

**मारुती स्तोत्र पठण कसे करावे?**

- सकाळी स्नान करून स्वच्छ वस्त्र परिधान करावे.
- हनुमानजींच्या मूर्तीसमोर किंवा मंदिरात बसावे.



- दिवा, उदबत्ती लावावी आणि हनुमानजींना सिंदूर, फुले, तेलाचा दीप आणि प्रसाद (लाडू किंवा केळी) अर्पण करावा.

**पठणाची पद्धत**

- शांत आणि एकाग्र मनाने बसावे.
- प्रथम मारुतीचे स्मरण करून संकल्प करावा. (उदा.- 'मी अमुक संकटातून मुक्तीसाठी हे पठण करीत आहे'.)
- मारुती स्तोत्र स्पष्ट उच्चाराने आणि भक्तीभावाने वाचावे.
- पठणानंतर हनुमानजींना प्रार्थना करून मनोकामना सांगावी आणि प्रसाद वाटावा.

**शनिवारी मारुती स्तोत्र वाचण्याचे फायदे?**

शनिवारी मारुती स्तोत्र (हनुमान स्तोत्र) वाचण्याचे अनेक आध्यात्मिक आणि मानसिक फायदे मानले जातात. हिंदू धर्मात हनुमानजींना संकटमोचक आणि शक्ती, भक्ती, बुद्धी यांचे प्रतीक मानले जाते. समर्थ रामदास स्वामी रचित 'श्री मारुती स्तोत्र' शनिवारी वाचण्यासाठी विशेष लोकप्रिय आहे. शनिवारी मारुती स्तोत्राचे नियमित पठण केल्याने हनुमानजींची कृपा प्राप्त होते, शनी दोषापासून संरक्षण मिळते आणि जीवनात सकारात्मक बदल घडतात.

**काय सावधगिरी बाळगाल?**

- पठणादरम्यान मन शुद्ध आणि भक्तीपूर्ण असावे.
- स्तोत्रातील शब्द नीट उच्चारावेत. कारण चुकीचे उच्चारण फलदायी ठरत नाही.
- शनिवारी मांस, मद्य आणि तामसी आहार टाळावा.

# सर्व पापातून मुक्तीसाठी उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मामध्ये एकादशीच्या तिथीला अत्यंत पवित्र मानले जाते. या दिवशी भगवान विष्णू यांची उपासना केल्याने जीवनात सुख-समृद्धी येते, अशी श्रद्धा आहे. चैत्र महिना हा आध्यात्मिक दृष्टीने महत्त्वाचा असून या महिन्यातील कृष्ण पक्षात येणाऱ्या पापमोचनी एकादशी निमित्त भाविक मोठ्या उत्साहाने व्रत करतात. २०२६ मध्ये ही एकादशी भक्तांसाठी विशेष फलदायी ठरणार असून या दिवशी उपवास, पूजा आणि दानधर्माला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. धार्मिक मान्यतेनुसार, या दिवशी खऱ्या श्रद्धेने पूजा केल्यास अजाणतेपणी घडलेल्या चुकांतून किंवा पापांतून मुक्ती मिळते. ज्योतिषशास्त्रानुसार, पापमोचनी एकादशी दिवशी आपल्या राशीनुसार काही साधे पण प्रभावी उपाय केले तर भगवान विष्णू यांचा आशीर्वाद पूर्ण वर्षभर प्राप्त होऊ शकतो.

मेष राशीच्या व्यक्तींनी या दिवशी भगवान विष्णू यांना पिवळी फुले आणि माता लक्ष्मीला लाल फुले अर्पण करावीत, तसेच 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' मंत्राचा ११ वेळा जप केल्यास करिअरमध्ये प्रगती होते. वृषभ राशीच्या लोकांनी देवाला पिवळ्या मिठाईचा नैवेद्य दाखवून तुळशीची पाने अर्पण करावीत आणि गरजूंना हळद किंवा चणा डाळ दान करावी. मिथुन राशीसाठी विष्णू सहस्रनामाचा पाठ आणि हिरव्या भाज्यांचे दान करणे मानसिक शांततेसाठी उत्तम ठरेल. कर्क राशीच्या जातकांनी केसरयुक्त दूध किंवा खडीसाखरेचा नैवेद्य दाखवावा, तर सिंह राशीच्या लोकांनी मंदिरात शुद्ध तुपाचा दिवा लावून गूळ आणि चणा डाळ दान केल्यास धनलाभाचे योग जुळून येतात. कन्या राशीच्या व्यक्तींनी देवाला पिवळे चंदन अर्पण करून स्वतःला टिळा लावावा, ज्यामुळे कामातील अडथळे दूर होतात. तुला राशीच्या लोकांनी विष्णू-लक्ष्मीची संयुक्त पूजा करून पिवळ्या मिठाईचा नैवेद्य दाखवावा.

वृश्चिक राशीसाठी विष्णूसहस्रनाम आणि लक्ष्मीला सिंदूर अर्पण करणे फलदायी ठरेल. धनु राशीच्या लोकांनी पिंपळाच्या झाडाखाली मोहरीच्या तेलाचा दिवा लावल्यास सौभाग्यात वाढ होते. मकर राशीच्या जातकांनी पिवळे वस्त्र परिधान करून देवालाही पिवळे वस्त्र अर्पण करावे, ज्यामुळे व्यवसायातील अडचणी सुटतात. कुंभ राशीच्या लोकांनी वस्त्रांचे दान करून मंत्रजप करावा आणि मीन राशीच्या व्यक्तींनी केसरयुक्त दूध किंवा पंचामृताचा नैवेद्य अर्पण केल्यास शुभ फळ प्राप्त होते.

# माणिक रत्न धारण करण्याचे नियम आणि फायदे

## कोणासाठी ठरेल हे रत्न भाग्यकारक?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्योतिषशास्त्रामध्ये ग्रहांची पीडा शांत करण्यासाठी आणि त्यांचे शुभ फळ मिळविण्यासाठी रत्न धारण करण्याचा मोलाचा सल्ला दिला जातो. नवग्रहांमध्ये सूर्याला ग्रहांचा राजा मानले जाते आणि 'माणिक' हे सूर्याचे मुख्य रत्न आहे. जर एखाद्या व्यक्तीच्या कुंडलीत सूर्य कमजोर असेल, तर त्याला यश मिळविण्यासाठी अनेक संकटांचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत माणिक रत्न धारण करणे अत्यंत लाभदायक मानले जाते. या बातमीच्या माध्यमातून आपण माणिक रत्न धारण करण्याचे नियम, त्याचे फायदे आणि ते कोणी परिधान करावे, याबद्दल सविस्तर माहिती जाणून घेणार आहोत.

माणिक रत्न धारण केल्याने व्यक्तीला समाजात मानसन्मान, प्रतिष्ठा आणि उच्च पद प्राप्त होते. ज्या व्यक्तींचा आत्मविश्वास कमी आहे, त्यांच्यासाठी हे रत्न अत्यंत प्रभावी ठरते. या रत्नाच्या प्रभावामुळे कार्यक्षेत्रात प्रगती होते आणि प्रशासकीय कामात यश मिळते. आरोग्याच्या दृष्टीने विचार केल्यास, डोळ्यांचे विकार, हाडांच्या समस्या आणि हृदयाशी संबंधित आजारांमध्ये हे रत्न सकारात्मक परिणाम देते असे मानले जाते. सूर्य हा उर्जेचा स्रोत असल्याने, माणिक धारण केल्याने शरीरात नवी ऊर्जा संचारते.

ज्योतिषशास्त्रानुसार सिंह राशीचा स्वामी सूर्य असल्याने सिंह राशीच्या लोकांसाठी माणिक रत्न अत्यंत शुभ मानले जाते. याव्यतिरिक्त मेष, वृश्चिक, धनु आणि मीन लग्नाच्या व्यक्तींसाठी देखील हे रत्न अनुकूल ठरू शकते. मात्र, रत्न धारण करण्यापूर्वी तज्ज्ञ ज्योतिषांचा सल्ला घेणे आवश्यक आहे, कारण कुंडलीतील सूर्याची स्थिती पाहूनच हे रत्न घालणे योग्य ठरते. मिथुन, कन्या, तूळ, मकर आणि कुंभ राशीच्या व्यक्तींनी साधारणपणे माणिक रत्न धारण करणे टाळावे. जर कुंडलीत सूर्याची स्थिती मारक किंवा अशुभ असेल, तर माणिक धारण केल्याने फायद्याऐवजी नुकसान होऊ शकते. तसेच, माणिक रत्नासोबत कधीही हिरा, नीलम, गोमेद आणि लसण्या ही रत्ने परिधान करू नयेत, कारण यांचा सूर्याशी शत्रुत्वाचा संबंध असतो.

माणिक रत्न धारण करण्यासाठी काही विशेष नियम पाळणे गरजेचे आहे. हे रत्न



सोन्याच्या किंवा तांब्याच्या अंगठीत जडवून अनामिका बोटात धारण करावे. माणिक किमान ५ ते ७ कॅरेटचे असणे उत्तम मानले जाते. हे रत्न धारण करण्यासाठी रविवारचा दिवस सर्वात शुभ असतो. शुक्ल पक्षातील रविवारी सूर्योदयानंतर अंगठीला गंगाजल आणि कच्च्या दुधाने शुद्ध करून सूर्याच्या मंत्राचा जप करत ती परिधान करावी. गडद लाल किंवा गुलाबी रंगाचा पारदर्शक माणिक सर्वोत्तम दर्जाचा मानला जातो. कोणतेही रत्न धारण करण्यापूर्वी आपल्या कुंडलीचे सविस्तर विश्लेषण करून घेणे महत्त्वाचे आहे, जेणेकरून त्याचा योग्य लाभ मिळू शकेल.

# शनिवारी एकदाच करा हा अचूक उपाय, सर्व त्रास होतील दूर!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शनिवारी केला जाणारा सर्वांत प्रभावी आणि रामबाण मानला जाणारा उपाय म्हणजे 'शनी देवाचा विशेष उपाय' किंवा 'शनिश्चरेश्वर महापूजा आणि दान'. शनिवारी शनीच्या प्रभावामुळे येणाऱ्या संकटांपासून मुक्ती मिळते, शनीची साडेसातीचा त्रास कमी होतो.

**शनिवारी करायचा सर्वांत प्रभावी रामबाण उपाय**

- फक्त एकदाच हा उपाय मनापासून आणि पूर्ण श्रद्धेने करा. मग पाहा लवकरात लवकर कसे सर्व संकट आणि त्रास नाहीसे होतील.
- काळ्या तिळीची विशेष पूजा करून दान द्यावे.
- शनिवारी सकाळी लवकर उठून स्नान करावे.
- स्वच्छ काळे किंवा निळ्या रंगाचे कपडे घालावे.
- घरात किंवा शनी मंदिरात जावे.
- शनीदेवांची मूर्ती किंवा फोटो पूजेवेळी समोर ठेवावा.
- एका लहान काळ्या कापडात १२५ ग्रॅम काळे तीळ घ्यावे. त्यावर ७ काळ्या मिरच्या, १ लोखंडी खीळा (म्हणजे मोठी कील) आणि १ कोळशाचा तुकडा बांधावा.

# शनिवार : वारांचे उपवास आणि व्रत कैवल्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शनिवार हा शनीचा व मारुतीचा वार आहे. या दिवशी एक वेळ उपवास करतात. सकाळी किंवा संध्याकाळी केव्हाही सोडला तरी चालतो. या दिवशी शनी माहात्म्य, शनी प्रार्थना, शनिष्टक, मारुतीची स्तोत्रे वगैरे वाचतात. शनीला व मारुतीला तेल घालतात व नारळ फोडतात. साडेसाती चालू असता शनी माहात्म्य वाचतात. शनीची व मारुतीची मूर्ती एकाच देवळात असते किंवा स्वतंत्रही असते. इंद्रनील हे शनीचे रत्न आहे. हे रत्न लाभले तर चांगलाच फायदा होतो. पण न लाभल्यावर नुकसान होण्याचीही भीती असते. इतरांचे मन जिंकण्याची शक्ती या रत्नात आहे. दर शनिवारी म्हणावयाचे काही शनी स्तोत्रे व अष्टक.

## दशरथकृत शनी स्तोत्र

नमः कृष्णाय नीलाय शितिकण् निभाय च।
नमः कालाग्निरूपाय कृतान्ताय च वै नमः ॥१॥
नमो निर्मांस देहाय दीर्घश्मश्रुजटाय च ।
नमो विशालनेत्रय शुष्कोदर भयाकृते॥२॥
नमः पुष्कलगात्रय स्थूलरोम्णेऽथ वै नमः।
नमो दीर्घायशुष्काय कालदष्ट्र नमोऽस्तुते॥३॥
नमस्ते कोटराक्षाय दुख्र्नरीक्ष्याय वै नमः ।
नमो घोराय रौद्राय भीषणाय कपालिने॥४॥
नमस्ते सर्वभक्षाय वलीमुखायनमोऽस्तुते।
सूर्यपुत्र नमस्तेऽस्तु भास्करे भयदाय च ॥५॥
अधोदृष्टेः नमस्तेऽस्तु संवर्तक नमोऽस्तुते।
नमो मन्दगते तुभ्यं निरिस्त्रणाय नमोऽस्तुते ॥६॥
तपसा दग्धदेहाय नित्यं योगरताय च ।
नमो नित्यं क्षुधार्ताय अतृप्ताय च वै नमः ॥७॥
ज्ञानचक्षुर्नमस्तेऽस्तु कश्यपात्मज सूनवे ।
तुष्टो ददासि वै राज्यं रुष्टो हरसि तत्क्षणात् ॥८॥
देवासुरमनुष्याश्च सि विद्याधरोरगाः ।
त्वया विलोकिताः सर्वे नाशंयान्ति समूलतः॥९॥
प्रसाद कुरु मे देव वाराहोऽहमुपागत ।
एवं स्तुतस्तदा सौरिर्ग्रहराजो महाबलः ॥१०॥
इति श्रीदशरथकृत शनि स्तोत्रम संपूर्णम।

## मारुती स्तोत्र

भीमरूपी महारुद्रा, वज्रहनुमान मारुती
वनारी अंजनीसूता रामदूता प्रभंजना ॥१॥
महाबळी प्राणदाता, सकळां उठती बळें
सौख्यकारी दुःखहारी, धूर्त वैष्णवगायका ॥२॥
दीनानाथा हरीरूपा, सुंदरा जगदंतरा
पातालदेवताहंता, भव्यसिंदूरलेपना ॥३॥
लोकनाथा जगन्नाथा, प्राणनाथा पुरातना
पुण्यवंता पुण्यशीला, पावना पारितोषिका ॥४॥
ध्वजांगे उचली बाहो, आवेशें लोटला पुढें
काळाग्नी काळरुद्राग्नी, देखतां कांपती भयें ॥५॥
ब्रह्मांडे माईली नेणो, आंवळे दंतपंगती
नेत्राग्नी चालिल्या ज्वाळा, भ्रुकुटी ताठिल्या बळें ॥६॥
पुच्छ ते मुरडिले माथां, किरीटी कुंडले बरीं
सुवर्ण कटी कांसोटी, घंटा किंकिणी नागरा ॥७॥
ठकारे पर्वता ऐसा, नेटका सडपातळू
चपळांग पाहतां मोठे, महाविद्युल्लतेपरी ॥८॥



कोटिच्या कोटि उड्डाणें, झेपावे उत्तरेकडे
मंद्राद्रिसारखा द्रोणू, क्रोधे उत्पाटिला बळें ॥९॥
आणिला मागुतीं नेला, आला गेला मनोगती
मनासी टाकिले मागे, गतीसी तुळणा नसे ॥१०॥
अणूपासोनि ब्रह्मांडाएवढा होत जातसे
तयासी तुळणा कोठे, मेरु मंदार धाकुटे ॥११॥
ब्रह्मांडाभोवते वेढे, वज्रपुच्छें करू शकें
तयासी तुलना कैची, ब्रह्मांडी पाहता नसे ॥१२॥
आरक्त देखिलें डोळा, ग्रासिलें सूर्यमंडळा
वाढता वाढता वाढे, भेदिलें शून्यमंडळा ॥१३॥
धन धान्य, पशूवृद्धि, पुत्रपौत्र समस्तही
पावती रूपविद्यादी, स्तोत्रपाठें करूनियां ॥१४॥
भूतप्रेत समंधादी, रोगव्याधी समस्तहीं
नासती तूटती चिंता, आनंदे भीमदर्शनें ||१५||
हे धरा पंधरा श्लोकी, लाभली शोभली बरी |
दृढदेहो निसंदेहो, संख्या चन्द्रकळा गुणें ||१६||
रामदासी अग्रगण्यू, कपिकुळासि मंडणू |
रामरूपी अंतरात्मा, दर्शने दोष नासती ||१७||
॥ इति श्री रामदासकृतं संकटनिरसनं मारुतिस्तोत्रं सम्पूर्णम् ॥

## शनी अष्टक स्तोत्र

अस्य श्रीशनैश्चरस्तोत्रमन्त्रस्य दशरथ ऋषिः। शनैश्चरो देवता। त्रिष्टुप् छन्दः। शनैश्चरप्रीत्यर्थे जपे विनियोगः।

**दशरथ उवाच**

कोणोन्तको रौद्र यमोऽथ बभ्रुः कृष्णः शनिः पिङ्गलमन्दसौरिः।
नित्यं स्मृतो यो हरते च पीडां तस्मै नमः श्रीरविनन्दनाय॥१॥
सुरासुराः किम्पुरुषोरगेन्द्रा गन्धर्वविद्याधरपन्नगाश्च।
पीड्यन्ति सर्वे विषमस्थितेन तस्मै नमः श्रीरविनन्दनाय॥२॥
नरा नरेन्द्राः पशवो मृगेन्द्रा वन्याश्च ये कीटपतङ्गभृङ्गाः।
पीड्यन्ति सर्वे विषमस्थितेन तस्मै नमः श्रीरविनन्दनाय ॥३॥
देशाश्च दुर्गाणि वनानि यत्र सेनानिषेशाः पुरपत्तनानि।
पीड्यन्ति सर्वे विषमस्थितेन तस्मै नमः श्रीरविनन्दनाय ॥४॥
तिलैर्यवैर्माषगुडान्नदानैर्लोहेन नीलाम्बरदानतो वा।
प्रीणाति मन्त्रैर्निजवासरे च तस्मै नमः श्रीरविनन्दनाय ॥५॥
प्रयागकूले यमुनातटे च सरस्वतीपुण्यजले गुहायाम।
यो योगिनां ध्यानगतोऽपि सूक्ष्मस्तस्मै नमः श्रीरविनन्दनाय॥६॥
अन्यप्रदेशात्स्वगृहं प्रविष्टस्तदीयवारे स नरः सुखी स्यात।
गृहाद्गतो यो न पुनः प्रयाति तस्मै नमः श्रीरविनन्दनाय॥७॥
स्रष्टा स्वयम्भूर्भुवनत्रयस्य त्राता हरीशो हरते पिनाकी।
एकस्त्रिधा ऋग्यजुस्साममूर्तिस्तस्मै नमः श्रीरविनन्दनाय॥८॥
शन्यष्टकं यः प्रयतः प्रभाते नित्यं सुपुत्रैः पशुबान्धवैश्च।
पठेत्तु सौख्यं भुवि भोगयुक्तः प्राप्नोति निर्वाणपदं तदन्ते॥९॥
कोणस्थः पिङ्गलो बभ्रुः कृष्णो रौद्रोऽन्तको यमः।
सौरिः शनैश्चरो मन्दः पिप्पलादेन संस्तुतः॥१०॥
एतानि दशनामानि प्रातरुत्थाय यः पठेत।
शनैश्चरकृता पीडा न कदाचिद्भविष्यति॥११॥
॥इति श्री दशरथकृतं श्री शनैश्चराष्टकं सम्पूर्णम॥

**शनीसारखेच मारुती स्तोत्रांचे पठण आणि वाचन दर शनिवारी किंवा दररोजही करू शकता.**
**मारुती स्तोत्र आणि हनुमान चालिसाचे दररोज पठण केल्याने सर्व बाधा दूर होतात.**

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)